पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ४७**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. २७/१/२०२०** रोजी दुपारी १२:३० (साडे बारा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २११२**

मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि.१६/१/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने मनपाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना, ज्या शुरवीरांनी छत्रपती श्री.शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या 'हिंदवी स्वराज्यासाठी' बलिदान केले, त्या शूरवीरांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे म्हणून 'तान्हाजी' हा चित्रपट मोफत दाखविण्यात यावा.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २११३**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील सन २०१७–१८ मधील पेठ सिव्हीललाईन अे फॉर्म क्र. ६११५ व ६११७ या मिळकतीच्या आकारणी प्रकरणाची व तद्नुषंगिक कागदपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२८०२ दि.१/३/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २६ सन २०१८–२०१९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/९९५ दि.२१/१/२०२० ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता–ब.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २११४**

पुणे महानगरपालिकेच्या ढोले पाटील रोड आरोग्य कार्यालयाकडील श्री.पाटील मधुकर निवृती, हुद्दा–आरोग्य निरिक्षक (वर्ग–३) यांच्या निलंबनाच्या कालावधीची पहिली सहामाही दि.१३/९/२०१८ रोजी पूर्ण झाली असून दि.१३/२/२०१९ रोजी दुसरी सहामाही पुर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/९७५ दि. १८/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २११५**

लेखापरीक्षण कार्यालयाकडील उप लेखापरीक्षक, सहाय्यक उप लेखापरीक्षक, कनिष्ठ लेखापरीक्षक या बढतीच्या पदावर नेमणूका करणेसाठी मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या निवडयादीतील अ,ब,क मध्ये शिफारस केलेल्या निवडयादीतील बढतीच्या पदावरील नेमणूका करण्यासाठी सेवकांचा दिलेला क्रम, मागासवर्गीस अनुशेष व आरक्षण, शासनाकडील वेळोवेळीचे आदेश,रिक्त जागांची उपलब्धता इ. आस्थापनाविषयक बाबी तसेच मा.खातेनिहाय बढती समितीचा अहवाल स्विकृत करुन मा.मुख्य लेखापरीक्षक यांनी बढतीने नेमणूका करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(२) नुसार मान्यता मिळणेबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांचे जा.क्र. मुलेप/१९९५ दि. १८/१/२०२० चे पत्र.

## संकीर्ण

**विषय क्र. २११६**

राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, ब्रम्ह सनसिटी, वडगावशेरी,पुणे येथील 7D थेटर यांस प्रवेशशुल्क आकारणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विदयुत/९९६ दि.२१/१/२०२० चे पत्र.

१) राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, ब्रम्ह सनसिटी, वडगावशेरी, पुणे येथील 7D थिएटर मध्ये लहान मुलांसाठी (३ वर्षापुढील व उंची ४ फुट ४ इंचापर्यंत) र.रू. २०/- प्रवेशशुल्क आकारणेस,

२) राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, ब्रम्ह सनसिटी, वडगावशेरी, पुणे येथील 7D थिएटर मध्ये प्रौंढासाठी र.रू. ४०/- प्रवेशशुल्क आकारणेस,

३) राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, ब्रम्हा सनसिटी, वडगावशेरी,पुणे येथील 7D थिएटर मध्ये विदेशी नागरिकांसाठी र.रू. १००/- प्रवेशशुल्क आकरणेस,

**विषय क्र. २११७**

पुणे पेठ बाणेर स.नं. ५२/४/१/१७ येथील प्लेग्राऊंड (पी.जी.५) ने आरक्षित ३७८.७१ चौ.मी. जागेचा टी.डी.आर देणेपोटी मालमत्ता व व्यवस्थापन या विभागामार्फत दि.१६/५/२०१९ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या क्षेत्राची, तडजोडीने ताब्याची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने चालू असलेल्या भूसंपादनातील (एलए-६०३) प्लेग्राऊंड (पी.जी.५) ने आरक्षित ३७८.७१ चौ.मी.क्षेत्र भूसंपादन कार्यवाहीतून वगळणेबाबत व तेवढ्या क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही कायमस्वरूपी रद्द करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, भूसंपादन शाखा, पुणे तसेच विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१६, पुणे यांना कळविणेत येत आहे. सदरची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन व्यव./१००१ दि.२२/१/२०२० चे पत्र.

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)